# आपल्या कर्तव्यासोबतच आरोग्याची काळजी घ्या

गोदातीर दि 05/07/2023

## पोलीस अधीक्षकांचा अधिकारी, कर्मचाऱ्यांना सल्ला




**नांदेड–** पोलीस अधिकारी व अंमलदार जनतेच्या सेवेत अहोरात्र सदैव तत्पर असतात. या व्यस्त जीवनशैलीत आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतात. त्यामुळे पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कर्तव्य बजावण्यासोबतच स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी केले.

जिल्हा पोलीस दलातील पोलीस अधिकारी अंमलदारांची पोलीस कल्याण विभागामार्फत मंगळवारी (दि.४) आरोग्य तपासणी करण्यात येत आहे. यावेळी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करत होते.

पोलीस कल्याण विभाग व जिल्हा शल्य चिकीत्सक, श्री गुरुगोबिंदसिघ जिल्हा शासकीय रुग्णालाय यांचे संयुक्त विद्यमाने पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांच्या आरोग्य तपासणीला दि. तीन जूलै रोजी श्री गुरूगोविंदसिंघ शासकीय जिल्हा रुग्णालयात सुरुवात झाली आहे.

यावेळी श्रीकृष्ण कोकाटे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निळकंट भोसीकर, पोलीस उप्अधीक्षक डॉ. अश्विनी जगताप यांच्या उपस्थिती होती.

### नांदेड पोलीस दलातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना मिळणार हेल्थ कार्ड

पोलीस अधिक्षक यांनी मार्गदर्शनपर बोलताना सांगीतले की, पोलीस अधिकारी व अंमलदार यांना कर्तव्यासोबतच स्वतःचे आरोग्य महत्वाचे आहे. आजाराबदल योग्य तात्काळ निदान झाल्यास त्यावर तात्काळ प्रतिबंध करणे सोपे जावे, एखाद्यास मोठ्या आजाराचे निदान झाल्यास तात्काळ उपचारास सुरुवात करता येईल. यासाठी आरोग्य तपासणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी वेळोवेळी स्वतःची व आपल्या कुटूंबाची आरोग्य तपासणी करून घेणे आवश्यक असल्या बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच पोलीस अंमलदार यांना

पोलीस अधिक्षक यांचे हस्ते हेल्थ कार्ड देण्यात आले आहे. तसेच जिल्ह्यातील सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांना आरोग्य तपासणी केल्यानंतर हेल्थ कार्ड देण्यात येणार आहे. महिला पोलीस अधिकारी व महिला पोलीस अंमलदार यांची स्त्री रुग्णालय, शामनगर नांदेड येथे तपासणी शिबीराची सुरूवात करण्यात आली.

नांदेड जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस स्टेशन, पोलीस मुख्यालय, जिवीशा, स्थागुशा, नियंत्रण कक्ष व इतर सर्व शाखेचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचे प्रत्येक पोलीस स्टेशन व शाखानिहाय वेळापत्रक तयार करून जिल्हा शासकिय रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालय येथे आरोग्य तपासणी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

सदर तपासणी शिबीर उद्घाटनप्रसंगी डॉ. निळकंठ भोसीकर, पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, डॉ. अश्विनी जगताप, पोलीस निरीक्षक अशोक घोरबांड, राखीव पोनि विजय धोंडगे, फौजदार माया भोसले, अंमलदार राखी कसबे, पोलीस कल्याण व इतर पोलीस अधिकारी व अंमलदार हे उपस्थित होते.